श्री.राहुल पिंटु सावलकर व इतर २१ यांचे प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२६८३/२०२३ मध्ये, दि.०३/०९/२०२५ रोजी व अवमान याचिका क्र.७४३/२०२५ मध्ये, दि.२७/०२/२०२६ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दि.०३/०९/२०२५ पासून १९ अधिसंख्य वनमजूरांचे पद निर्माण करुन २१ मजूरांना माहे सप्टेंबर, २०२५ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीतील वेतनाच्या फरकाची रक्कम रु.१,०१,७२२/- वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२०२५/१०६४/प्र.क्र.१३६/वने-१२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०६ मे, २०२६.

वाचा :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.एलएबी-१०२४/प्र.क्र.२५२/फ-९, दि.३१/०१/१९९६.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९, दि.१६/१०/२०१२.

३) मा. औद्योगिक न्यायालय, मुंबई यांचा तक्रार (युएलपी) क्र.३००/२०२६ मधील दि.१२/१२/२०२२ चा न्याय निर्णय.

४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा रिट याचिका २६८३/२०२३ मधील दि.०३/०९/२०२५ चा न्याय निर्णय.

५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा अवमान याचिका क्र.७४३/२०२५ मधील दि.२७/०२/२०२६ चा न्याय निर्णय.

६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-विधी-३१/७(२)न-१६२/रोम/प्र.क्र.०५(२५-२६)/८३५/२५-२६,दि.१८/११/२०२५.

७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-विधी-३१/७(२)न-१६२/रोम/प्र.क्र.०५(२५-२६)/१०४२/२५-२६, दि.०६/०२/२०२६.

८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-विधी-३१/७(२)न-१६२/रोम/प्र.क्र.०५(२५-२६)/१०४९/२५-२६, दि.०९/०२/२०२६.

९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-विधी-३१/७(२)न-३८/रोम/प्र.क्र.०५(२५-२६)/११९/२५-२६,दि.२९/०४/२०२६.

१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३, दि.१७/०८/२०२३.

**<u>प्रस्तावना :-</u>**

वन विभागामध्ये कार्यरत असलेल्या ज्या रोजंदारी मजूरांनी योजनातंर्गत/योजनेत्तर योजनेमध्ये दि.०१/११/१९८९ ते दि.३१/१०/१९९४ पर्यंत प्रत्येक वर्षी २४० दिवस याप्रमाणे ५ वर्षांची सलग सेवा पूर्ण केली आहे, अशा रोजंदारी मजुरांना दि.०१/११/१९९४ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर कायम करण्याचा निर्णय शासनाने दि.३१/०१/१९९६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. तद्नंतर, दि.१६/१०/२०१२ च्या शासन निर्णयान्वये, ज्या रोजंदारी मजूरांनी दि.०१/११/१९९४ ते दि.३०/०६/२००४ पर्यंत प्रतिवर्ष २४० दिवस याप्रमाणे सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या ५ वर्षांची सेवा पूर्ण केली आहे, अशा रोजंदारी मजुरांना दि.०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर कायम करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त दोन्ही शासन निर्णयामध्ये ५ वर्षांच्या कालावधीची गणना करताना रोजगार हमी योजना किंवा तत्सम योजने अंतर्गत केलेल्या कामाचे दिवस विचारात घेण्यात येऊ नये, अशीही तरतूद करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी, महाराष्ट्र कामगार संघ, मालाड (पूर्व), मुंबई यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे कार्यरत ७७ कामगारांच्या वतीने कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ, अधिकार व हक्क प्रदान करण्याबाबत मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे दि.२६/०९/२०१६ रोजी तक्रार (यु.एल.पी.) क्र.३००/२०१६ दाखल केली होती. सदरहू प्रकरणी मा.औद्योगिक न्यायालयाने दि.१२/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये तक्रार फेटाळली. सदरहू प्रकरणातील तक्रारदार हे सन २००५ नंतर वन विभागात वन कामगार म्हणून नियुक्त झालेले आहेत.

३. मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि.१२/१२/२०२२ रोजीच्या आदेशाविरुध्द श्री.राहुल पिंटु सावलकर व इतर २१ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.२७/०२/२०२३ रोजी रिट याचिका क्र.२६८३/२०२३ दाखल केली. सदरहू प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.०३/०९/२०२५ रोजी, (यापूर्वीच्या अन्य मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेऊन) मा.औद्योगिक न्यायालयाचा दि.१२/१२/२०२२ चा निर्णय रद्दबादल करुन याचिकाकर्ता श्री.सावलकर व इतर यांना कायम करावे व त्यानुषंगाने त्यांना थकबाकीची रक्कम कालबध्दरित्या अदा करण्याबाबतचे आदेश प्रतिवादींना दिले.

४. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि.०३/०९/२०२५ च्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.Diary No.१००१४/२०२६ ही मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०२६ च्या आदेशाने खारिज केली आहे.

५. मा. उच्च न्यायालयाच्या दि.०३/०९/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे, तक्रारदारांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अवमान याचिका क्र.७४३/२०२५ मध्ये दि.२७/०२/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने वन खात्याच्या मुख्यालयाकडून शासनास दि.०९/०२/२०२६ रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर गुणवत्तेनुसार कार्यवाही करुन दि.२६/०३/२०२६ पूर्वी अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रतिवादींना देण्यात आले होते.

६. त्यानुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२६८३/२०२३ व अवमान याचिका क्र.७४३/२०२५ मध्ये अनुक्रमे दि.०३/०९/२०२५ व दि.२७/०२/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांनी दि.०९/०२/२०२६ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार श्री.राहुल पिंटु सावलकर व इतर १८ मजुरांकरीता दि.०३/०९/२०२५ पासून अधिसंख्य वनमजूराचे पद निर्माण करण्याचा अशा एकंदर १९ रोजंदारी मजूरांना दि.०३/०९/२०२५ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करणे (अन्य ३ मजूर यापुर्वीच कायम झाले आहेत) व २१ रोजंदारी मजूरांना माहे सप्टेंबर, २०२५ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीतील वेतनाच्या फरकाची एकूण रक्कम रु.१,०१,०२२/- इतक्या रक्कमेस मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र राज्यात वन विभागाअंतर्गत रोपवाटीका, मध्यावर्ती आगार, रोपवन चौकीदार, कुटी, कुप निष्कासन कामे, कुप छपाई, वृक्ष छपाई, अग्नी प्रतिबंधक जाळ रेषा, तपासणी नाका इत्यादी निरनिराळया कामासाठी मजूर ठेवण्यात येतात. त्यानुसार ज्या मजूरांनी वन विभागामध्ये योजनांतर्गत/योजनेत्तर योजनेमध्ये काम केले आहे, अशा रोजंदारी मजूरांना काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दि.३१/०१/१९९६ तसेच दि.१६/१०/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य वनमजूर म्हणून नियमित करण्यात येते.

तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२६८३/२०२३ व अवमान याचिका क्र.७४३/२०२५ मध्ये अनुक्रमे दि.०३/०९/२०२५ व दि.२७/०२/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, श्री.राहुल पिंटु सावलकर व इतर १८ रोजंदारी मजूर यांचेकरीता दि.०३/०९/२०२५ पासून सदर पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत अथवा अन्य मार्गाने पद रिक्त होईपर्यंत वनमजूराचे अधिसंख्य पद निर्माण करण्यास (अन्य ३ मजूर यापुर्वीच कायम झाले आहेत) तसेच २१ रोजंदारी मजूरांना माहे सप्टेंबर, २०२५ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीतील वेतनाच्या फरकाची एकूण रक्कम रु.१,०१,७२२/- (रुपये एक लाख एक हजार सातशे बाबीस फक्त) इतकी रक्कम मागणी क्र.सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण व विकास १०१ (१२) वन मजूरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती, लेखाशिर्ष (२४०६ १८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षामधून उपलब्ध करुन देण्यास सदर निर्णय हा पूर्वादाहरण म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही या अटींच्या अधीन राहून एक विशेष बाब म्हणून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. श्री.राहुल पिंटु सावलकर व इतर २० यांना अदा करावयाच्या रक्कमेची परिगणना अचूक असल्याची खातरजमा वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या कार्यालयाची राहील. तसेच वाचा येथील अ.क्र.०८, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१७/०८/२०२३ मधील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी.

३. उक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (१२) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती, (१२) (०१) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती (अनिवार्य), (२४०६-१८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षातंर्गत सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौ.संदर्भ क्र.२६२/व्यय-१०, दि.२०/०३/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.८५/आपुक, दि.३०/०३/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०५०६१३३०४५३६१९ असा आहे. सदरचा शासन निर्णय डिटीजल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA
DATTATRAY SONJE

Digitally signed by MANJUSHA DATTATRAY SONJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=8E491E40DA312B87356D474F3637BDB55DFF1AA207B1723030265AD04926CADB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=14ABD3DD33A977D709D803B6057EB9FE0DE69BD4ACD4BF7CA36CED00F53EA72C, cn=MANJUSHA DATTATRAY SONJE
Date: 2026.05.06 13:32:12 +05'30'

**(मंजुषा सोनजे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
६) वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
७) उपसंचालक (दक्षिण), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (व्यय-१०/आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) कार्यासन अधिकारी (वने-१/वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.